## प्रतिवादी क्र.१ व २ तर्फे उलटतपास – श्री. एस. एस. इंजल वकील.

**३.** माझे बारावी पर्यंतचे शिक्षण झाले आहे. माझी पेरणोली येथे गट क्र.१०५ ची मिळकत आहे. हे म्हणणे खरे नाही की, ती जमीन हरपवडे– देवकांडगाव रस्त्यालगत आहे. त्या जमिनीच्या पुर्वेला मुळीक यांची जमीन, पश्चिमेला गावाचे पटांगण, उत्तरेला सुतार यांची जमीन आणि दक्षिणेला येरुडकरांची जमीन आहे. मला दावा मिळकतीचा पुर्वीचा व चालू सर्वे क्रमांक सांगता येणार नाही. मला तो माहिती नसल्यामुळे मी माझ्या शपथपत्रात नमूद केलेला नाही.

**४.** दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकी देवस्थान अशी नोंद आहे. मला त्यामध्ये कब्जेदार सदरी उषाताई हणमंत परुळेकर आणि शकुंतला देशमुख यांची नावे असल्याची माहिती नाही. मी वादीच्या पूजाअर्चा अधिकाराचा कागदोपत्री पुरावा पाहिलेला आहे. मी त्याबाबतचा कोणता कागद पाहिला होता ते आता निश्चित सांगू शकत नाही. मी दावा मिळकतीचा ७/१२ उतारा पाहिलेला नसल्यामुळे मला त्यावरती वादींच्या नावाची नोंद असल्याची माहिती नाही.

**५.** मी दावा मिळकती वरती कृष्णा विठू कांबळे व त्यानंतर थळू आणि महादेव कांबळे यांची मालकी असल्याचा कागद पाहिलेला नाही. मी दावा मिळकती बाबतची पिक–पाहणीची नोंद पाहिलेली आहे. मला १९८९–१९९० पासून प्रतिवादी क्र.१ ची पिक–पाहणी नोंद असल्याची माहिती नाही. मी वादीची पिक–पाहणी नोंद पाहिलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकती १९८९ पासून प्रतिवादी क्र.१ व २ च्या ताब्यात आहेत. त्यामध्ये प्रतिवादींचे घर असून ते १० ते १५ वर्षांपूर्वी बांधण्यात आलेले आहे. त्या जमिनीमध्ये पाईपलाईन व विहिर आहे. मला ती विहिर व पाईपलाईन प्रतिवादी क्र.१ ने केल्याबाबत माहिती नाही. मला त्या विहिरीचे विज कनेक्शन प्रतिवादी क्र.१ च्या नावावरती असल्याचे सांगता येणार नाही. मला त्या जमिनीतील घराचा फाळा प्रतिवादी क्र.१ भरत असल्याची माहिती नाही.

**६.** पेरणोली गावात थळू कृष्णा कांबळे नावाची एकच व्यक्ती होती. मी त्याला ३० ते ३५ वर्षांपासून तो गावातील असल्यामुळे ओळखत होतो. तो स्वाक्षरी करत होता,

मी त्याची स्वाक्षरी पाहिल्यास ओळखू शकतो. आता मला दाखवलेल्या नि. क्र.१६४ वरती थळू कृष्णा कांबळेची स्वाक्षरी आहे. (वादीच्या विधिज्ञांनी साक्षीदाराला मूळ प्रत उपलब्ध नसल्यामुळे स्वाक्षरी ओळखण्यासाठी छायांकित प्रत दाखवता येत नसल्याबाबत आक्षेप घेण्यात आला आहे. साक्षीदाराला दाखवलेला दस्त निशाणीकृत असल्यामुळे आक्षेप नाकारण्यात येतो.)

**७.** हे म्हणणे खरे नाही की, वादीचा दावा मिळकतीशी कोणताही संबंध नाही. मी प्रतिवादींनी वादीकडे दावा मिळकतीच्या ताब्याची केव्हा मागणी केली याबाबत सांगू शकत नाही. मी पुर्वी युवा कॉंग्रेसचा कार्यकर्ता होतो. प्रतिवादी क्र.१ भा. ज. पा. पक्षाचा कार्यकर्ता असून त्याचा मुलगा सध्या शिवसेना पक्षाचे काम करतो. आम्ही दोघे वेगवेगळया राजकीय गटाचे काम पाहतो. माझी दावा मिळकतीच्या चतुःसिमे लगत स्वतःची जमीन नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीं वरील राजकीय द्वेषाने वादीला मदत करण्यासाठी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – ०२.०३.२०२६.                 दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.